

संस्कृत साहित्य सरिता

रघुवंश

संस्कृत
साहित्य
सरिता
: १

कालिदास-कृत

रघुवंश

कथासार
अमरेन्द्र

वोरा ॲन्ड कंपनी, पब्लिशर्स (प्रायव्हेट) लि०

प्रकाशक :
एम्. के. बोरा
बोरा अॅन्ड कंपनी,
पब्लिशर्स (प्रायव्हेट) लि०
३ राउंड बिल्डिंग,
काळबादेवी रस्ता, मुंबई २

किंमत सहा आणे
पहिली आवृत्ती : १९५६

मुद्रक :
अनंत चिंतामण रायरीकर
'स्वस्तिक मुद्रणालय'
४३९ शनवार पेठ, पुणें २

संस्कृत-साहित्य-सरिता

विशाल महासागराला असंख्य नद्या येऊन मिळत असतात. अशा अगणित नद्यांनींच अमर्याद सागर बनलेला असतो. संस्कृत साहित्याचा महासागरहि असाच अनेक सरितांनीं समृद्ध झालेला आहे. ' संस्कृत-साहित्य-सरिता ' असें नांव दिलेल्या या वाङ्मयमालेंतून आपली आदिभाषा जी संस्कृत तिच्यांतील उत्तम उत्तम वाङ्मयाचा कथारूपानें थोडक्यांत परिचय करून देण्याचें आम्ही योजिलें आहे. संस्कृत वाचणारे थोडे आणि समजणारे तर त्याहून कमी. तेव्हां आजच्या सर्वसामान्य माणसाला, लिहितां-वाचतां येऊं लागलेल्या नवशिक्षितालाहि या संस्कृत-वाणीचा आस्वाद कसा घेतां येणार ? परंतु त्यांना तो मिळणें तर आवश्यक आहे; कारण संस्कृत भाषेंतील वाङ्मय हा आपला फार थोर वारसा आहे. तो गमावणें म्हणजे सर्वस्वच गमावून बसणें. यासाठींच संस्कृत भाषेंतील थोर, प्रसिद्ध अशा वाङ्मयकर्तीचें, नाटकांचें आणि काव्यांचें, कथासार वाचकांपुढें सादर करीत आहोंत.

आम्ही असें समजतों कीं, देवभाषेंतील या वाङ्मयीन कलाकृतींचा परिचय करून देण्याची आमची ही योजना एक चांगली योजना आहे—एक सत्संकल्प आहे. आणि असे सत्संकल्प उत्तम रीतीनें तडीला नेण्याचें काम जनताजनार्दनाचेंच आहे. तें तसें घडो, हीच इच्छा.

—प्रकाशक

प रि च य

'रघुपति' 'राघव', 'रघुवीर' 'रामचंद्र' हे पवित्र शब्द आपल्या भारत देशांत शेकडों वर्षांपासून चालत आलेले आहेत. राम ज्या थोर कुळांत जन्माला आले तें रघुकुल. वैवस्वतापासून हें महान राजघराणें सुरू झालें. त्या रघुकुळाचा इतिहास सांगणारें एक महाकाव्य पुष्कळ वर्षांपूर्वी कालिदास कवीनें लिहिलें. त्याच्या या महाकाव्यांत जसा इतिहास आहे तसेंच त्यांत काव्याचे सर्व गुणहि सामावलेले आहेत. उपमेनें आपली कलाकृती खुलवून दाखविण्यांत तर कालिदासाचा हातखंडाच आहे. यांतलीं आदर्श व्यक्तींचीं वर्णनें मनाला वरच्या वातावरणांत नेऊन जसा आनंद देतात तशींच यांतील सुंदर निसर्ग-वर्णनेंहि चित्ताला आल्हाद देतात.

मोठमोठे राजे उत्पन्न झाले, त्यांनीं प्रचंड साम्राज्यें स्थापन केलीं आणि एक दिवस तीं काळाच्या उदरांत गडप होऊन गेलीं. परंतु दिलीप–दशरथासारखे आणि रघु–रामचंद्रासारखे जे महापुरुष निर्माण झाले त्यांची कीर्ति कधीं क्षीण झाली नाहीं कीं नाहींशीहि झाली नाहीं. त्यांच्या थोर चरित्रांचे आदर्श 'रघुवंशा'नें आजहि आपणासमोर ठेवले आहेत ही ' रघुवंशा ' ची केवढी महती !

—अमरेन्द्र

र घु वं श

सूर्यवंशामध्यें वैवस्वत नांवाचा एक मोठा पराक्रमी राजा होऊन गेला. सूर्यकुलांतील हा पहिला राजा. याच्यापासून सूर्यकुलाचा प्रारंभ झाला. या राजकुळांतच पुढें दिलीप राजा उदयाला आला. दिलीपाच्या राज्यकारभारानें सर्वांना सुख मिळूं लागलें. दिलीपाचें वर्तन जितकें शुद्ध होतें तितकाच त्याचा पराक्रम मोठा होता.

या वैभवशाली राजाच्या पत्नीचें नांव सुदक्षिणा. राजाराणींचें एकमेकांवर अतिशय प्रेम होतें. परंतु पोटीं संतान नसल्यामुळें तीं दोघेंहि मनांतून कष्टी होतीं. पुष्कळ वर्षें होऊन गेलीं तरी त्यांना मूलबाळ कांहीं झालें नाहीं. तेव्हां अखेर त्यांनीं आपले गुरु वसिष्ठ ऋषि यांच्याकडे जाण्याचें ठरविलें.

राज्यकारभार मंत्र्यांच्या हातीं सोंपवून राजा दिलीप व राणी सुदक्षिणा एके दिवशीं वसिष्ठांच्या आश्रमांत निघून आलीं. गुरु वसिष्ठ व त्यांची पत्नी अरुंधती या दोघांनाहि राजाराणींनीं लवून नमस्कार केला. त्यांना आशीर्वाद देत वसिष्ठांनीं 'सर्व कांहीं ठीक चाललें आहे ना?' असा खुशालीचा प्रश्न विचारला. सर्व कांहीं उत्तम चाललें असल्याचें सांगून राजा दिलीप म्हणाला, "पण गुरुदेव, मुलगा नसल्यामुळें ह्या साऱ्या वैभवांतहि आम्हांला सुख वाटत नाहीं. कृपा करून आमचा वंश चालविणारा मुलगा आम्हांला होईल असा कांहीं तरी उपाय आपण सांगा.

आत्तांपर्यंत आमच्या या इक्ष्वाकु वंशांतले पुरुष प्रत्येक अडचणींतून आपल्या साहाय्यानेंच पार पडलेले आहेत. "

राजाचे ते मानसिक दु:खाच्या कढांतून उमटलेले शब्द ऐकून वसिष्ठ विचार करूं लागले. थोडा वेळ डोळे मिटून ध्यान केल्यावर त्यांना असें दिसून आलें. ते सांगूं लागले.

" राजा, पूर्वी एकदां तूं देवराज इंद्राचा निरोप घेऊन स्वर्गलोकांतून पृथ्वीवर येत होतास. तुला आठवत नसेल, पण त्या वेळीं वाटेंतच कल्पवृक्षाखालीं देवांची गाय कामधेनु सुरभि विसांव्याला बसली होती. परंतु अयोध्येला राज-वाड्यांत असलेल्या आपल्या पत्नीकडे लवकर परतण्याच्या लगबगींत तूं असल्यामुळें तुझें लक्ष कामधेनूकडे गेलें नाहीं. वास्तविक कामधेनु ही पूज्य आहे. आणि तूं तर तिच्याकडे लक्षहि न देतां पुढें निघून गेलास. त्यामुळें अर्थातच ती तुझ्यावर रागावली आणि तिनें तुला शाप देऊन टाकला कीं, " ज्या अर्थी आपल्या पत्नीच्या विचारांत मग्न राहून तूं माझा अपमान केला आहेस त्या अर्थी जोंपर्यंत माझ्या मुलीची सेवा तूं करणार नाहींस तोंपर्यंत तुझ्या राणीच्या पोटीं मुलगा जन्माला येणार नाहीं. "

" कामधेनूनें हा शाप दिला तेव्हां आकाशांत गडगडाट होत असल्यानें तुला तो शाप ऐकूंहि आला नाहीं. परंतु तुला मुलगा न होण्याचें खरें कारण हें आहे. तेव्हां तूं आतां असें कर. माझ्या आश्रमांत कामधेनूची मुलगी नंदिनी आहे. तिची तुम्ही दोघांनींहि भक्तिभावानें सेवा केलीत तर ती प्रसन्न होईल आणि तिच्या कृपेनेंच पुत्रप्राप्तीची तुझी इच्छा पुरी होईल. "

गुरु वसिष्ठ इतकें बोलताहेत तोंच नन्दिनी समोर दिसली. रानांत चरावयाला गेली होती तिकडून ती याचवेळीं आश्रमांत परत येत होती.

नन्दिनीला समोर पाहातांच वसिष्ठ म्हणाले, "राजा नांव घेतांच ही दत्त म्हणून येऊन समोर उभी राहिली त्या अर्थी तुझी मनकामना पुरी झालीच असें समज. मात्र ही प्रसन्न होईपर्यंत तुला हिची मनःपूर्वक सेवा करीत राहिलें पाहिजे."

राजाराणींनीं गुरु वसिष्ठांची आज्ञा तत्काळ मान्य केली. आश्रमांत राहूनच त्या दोघांनीं नन्दिनीची सर्व प्रकारें सेवा करावयास सुरुवात केली.

दुसरे दिवशीं सकाळीं तीं दोघेंहि आश्रमांतील वेद-मंत्रांच्या पठणानें जागीं झालीं. राणी सुदक्षिणेनें नन्दिनीची गंधफुलांनीं पूजा केली. वासराचें पोट भरतांच दिलीपानें नन्दिनीचें दावें सोडलें. गाय रानाकडे निघाली तेव्हां राजा-राणीहि तिच्या मागोमाग चालूं लागलीं. थोडें दूर गेल्यावर दिलीपानें राणीला सेवकांसह परत पाठवून दिलें आणि तो एकटाच गायीबरोबर पुढें निघाला. गाय मनाला येईल त्याप्रमाणें चरत चरत रानांत फिरत होती आणि राजाहि धनुष्य-बाण घेऊन तिच्या रक्षणासाठीं तिच्या मागोमाग चालला होता. गाय जिथें थांबेल तिथें तोहि थांबे, ती विसांवा घेत बसेल तिथें हाहि बसे. कधीं तिला कोवळा कोवळा चारा आणून भरव, कधीं नवीन उगवलेल्या कोंबासारख्या तिच्या नितळ पाठीवरुन हात फिरव, कधीं तिच्या अंगावर बसणाऱ्या माश्या वार, अशा प्रकारें

दिलीप राजा नन्दिनीची अगदीं मनापासून सेवा करीत होता.

रात्रीं दूध काढून झाल्यावर राजाराणींनीं नाना प्रकारें गायीची सेवा केली. गायीला झोंप लागल्यानंतर तीं दोघें झोंपण्यासाठीं तेथून उठलीं. आणि पुन्हा सकाळीं गायीच्या अगोदर उठून तिच्या सेवेंत तत्पर झालीं.

याप्रमाणें नन्दिनीच्या सेवेचा कार्यक्रम दररोज चालू झाला. होतां होतां असे एकवीस दिवस लोटले, तेव्हां नन्दिनीच्या मनांत आलें कीं आतां राजा दिलीपाची परीक्षा पाहावी.

दुसऱ्या दिवशीं ती गाय चरत चरत हिमालयांतील एका गुहेंत शिरली. राजा हिमालयाची शोभा पाहात गायीच्या रक्षणासाठीं बाहेरच उभा होता. इतक्यांत एकाएकीं त्या गायीचा करुण हंबरडा त्याला ऐकूं आला. त्यानें झटदिशीं पुढें होऊन पाहिलें तों गुहेंत एका सिंहानें तिच्यावर झेप टाकली असून तो तिला खाण्याच्या बेतांत आहे. अर्थातच त्याचा उजवा हात पाठीशीं असलेल्या भात्यांतून बाण खेंचण्यासाठीं वळला. पण तो हात तिथेंच चिकटून राहिला. राजानें पुष्कळ प्रयत्न केला पण तो तेथून निघेचना. आश्चर्यानें व दुःखानें राजा अगदीं संतापून गेला. नन्दिनीचा जीव सिंहाच्या तावडींतून वांचवितां येत नाहीं, असें पाहून त्याला अतिशय राग आला. पण इतक्यांत समोरचा सिंह माणसाप्रमाणें बोलूं लागून त्याला म्हणाला, " हे राजा, मोठमोठीं झाडें मुळापासून उपटून टाकणारा वारा कितीहि शक्तिवान झाला तरी दगडी कातळाचें तो

काय वांकडें करूं शकणार ! मला मारण्याच्या फंदांत तूं पडूं नयेस हें बरें !

"बाबारे, मी असा तसा सिंह नव्हें. माझें नांव कुंभोदर. तिथें समोर जो देवदाराचा वृक्ष दिसतो आहे ना, तो भगवान शंकरांचा मानलेला मुलगा आहे. देवी पार्वतीनें त्याला आपल्या हातांनीं पाणी घालून लहानाचा मोठा केला आहे. मागें एकदां एका जंगली हत्तीनें त्याला आपली पाठ घासल्यामुळें त्याची साल निघाली होती. तें पाहून देवी पार्वतीला फार वाईट वाटलें. तेव्हांपासून त्या झाडाचें रक्षण करण्यासाठीं माझी इथें नेमणूक झालेली आहे ; आणि नियम असा घालून दिलेला आहे कीं, जो कोणी प्राणी आपसुख येथें चालत येईल त्याची शिकार करून मीं आपलें पोट भरावें. ही गाय आपल्या पायांनींच चालत इथें आली. आतां ती माझ्या पोटांत जाऊन माझी भूक चांगली भागेल. हे राजा, शस्त्रानें ज्याचें रक्षण करावयाचें त्याचें रक्षण प्रयत्न करूनहि होऊं शकत नाहीं, असें ठरलें तर त्यांत शस्त्रधाऱ्याला कांहीं दोष लागत नाहीं. तेव्हां तुला यांत लाज वाटण्यासारखें कांहीं नाहीं. आतां तूं या गायीला वांचविण्याच्या भरीला न पडतां ऋषींच्या आश्रमांत परत जा. तूं तुझें कर्तव्य केलेलें आहेस. तुझी गुरुभक्तिहि दिसून आलेली आहे."

बाण सोडून सिंहाला मारणें अशक्य आहे असें राजाला दिसून आलें, तेव्हां तो हात जोडून त्याला म्हणाला "तुझे धनी आणि या जगाचे निर्माते, रक्षण व नाश करणारे जे बलाढ्य महादेव त्यांना मी नमस्कार करतों. परंतु गुरूंच्या

यज्ञाचें साधन असलेली ही गाय मारली जात असतांना तें मी स्वस्थ बसून कसें पाहूं? हे वनराज, येऊन जाऊन तुझा भुकेचाच प्रश्न आहे ना? मग असें कर, त्या गायीला सोडून दे आणि तिच्याऐवजीं तूं मलाच खाऊन टाक."

"तूं अगदींच असमंजस मनुष्य दिसतोस, राजा" सिंहानें त्यावर हंसून उत्तर दिलें. "आपला जीव देऊन तूं केवळ एका गायीला वांचविणार? त्यापेक्षां जिवंत राहून आपल्या सर्व प्रजेचें पुष्कळ वर्षेंपर्यंत रक्षण करीत राहणें, हेंच शहाणपणाचें नाहीं का?"

"एक तर असें करण्यानें मी माझा क्षत्रियधर्म गमावून बसेन." राजा त्यावर उत्तरला. "दुबळयांचें रक्षण करतात तेच खरे क्षत्रिय.आणि दुसरें, ही गाय म्हणजे कांहीं सामान्य नाहीं. देवांच्या गायीइतकें हिचें महत्त्व असून असंख्य गायी एकत्र केल्या तरी त्यांनीं हिची बरोबरी होणार नाहीं."

अशा प्रकारें राजा दिलीपानें त्या शंकर-सेवक सिंहाची पुष्कळ विनवणी केली. "तूं आपल्या धन्याच्या कामासाठीं जर एवढे श्रम घेतोस तर माझ्या गुरूंच्या सेवेसाठीं मला आपले प्राण देऊन त्यांच्या या यज्ञाच्या गायीची सुटका करण्याच्या बाबतींत कां अडवतोस? तेव्हां तूं मलाच खाऊन टाक." असें म्हणून राजानें धनुष्यबाण बाजूला काढून ठेवले आणि स्वतः त्या सिंहासमोर त्यानें आपल्याला खावें म्हणून तो आडवा पडला.

पण इतक्यांत काय चमत्कार झाला! सिंहाची झडप त्याच्या अंगावर येण्याऐवजीं आकाशांतून त्याच्यावर पुष्प-वृष्टि होऊं लागली. राजानें आश्चर्यानें उठून पाहिलें तों

तेथें सिंह नव्हता. देव वरून त्याच्यावर फुलें उधळीत होते आणि गुरु वसिष्ठांची गाय नन्दिनी प्रेमळपणानें त्याच्याकडे पाहात म्हणत होती, " हे थोर पुरुषा, ऊठ. माझ्या मायेचाच हा सगळा खेळ होता. गुरु वसिष्ठांचा असा प्रभाव आहे कीं प्रत्यक्ष यमसुद्धां माझ्यावर हात टाकूं शकत नाहीं, तिथें या एका सामान्य सिंहाची काय कथा? तुझ्या गुरुभक्तीनें व तूं केलेल्या माझ्या कठिण सेवेनें मी प्रसन्न झालें आहें. मी केवळ दूध देणारी गाय नाहीं,मी वरहि देऊं शकतें. तुझ्या इच्छेला येईल तो वर माग. "

राजानें नन्दिनीला नम्रपणानें नमस्कार करून म्हटलें, " आपल्या कुळाची कीर्ति वाढवील असा सुपुत्र राणी सुदक्षिणेच्या पोटीं जन्माला येऊं दे,हेंच माझें मागणें आहे." नन्दिनीनें लगेच ' तसें होईल. ' असा आशीर्वाद देऊन सांगितलें कीं, "एका द्रोणांत माझें दूध काढून तुम्ही दोघेंहि प्या म्हणजे तुमचे मनोरथ पूर्ण होतील."

अत्यंत आनंदित अंतःकरणानें व समाधानानें आश्रमांत परत आल्यावर राजानें ही हकीकत गुरु वसिष्ठांना सांगितली. राणीलाहि सर्व गोष्टी समजल्या. नन्दिनीनें सांगितल्याप्रमाणें तिचें दूध पिऊन तीं दोघें–राजाराणी–वसिष्ठांचा आशीर्वाद घेऊन अयोध्येला परत आलीं.

राणी सुदक्षिणेला सुमुहूर्तावर एक सुलक्षणी मुलगा झाला. या मुलाचें नांव ठेवलें रघु. या पुत्रजन्मानें अयोध्येंत सर्वत्र आनंदीआनंद पसरला.

हळुहळु रघु मोठा होऊं लागला. अतिशय चलाख बुद्धीचा

असल्यामुळें तो चारी विद्या अगदीं लवकर शिकला. यथावकाश त्याचें लग्नहि झालें. आणि युवराज होण्यासाठीं आवश्यक ते गुण त्याच्या अंगीं येतांच राजा दिलीपानें रघूला युवराज केलें.

त्यानंतर राजा दिलीपानें शंभर अश्वमेध करण्याचें ठरविलें. अश्वमेधाच्या घोड्याचें रक्षण करण्याची कामगिरी युवराज रघूकडे देण्यांत आली. रघूनें ती कामगिरी उत्तम रीतीनें पार पाडली आणि पित्याचे नव्याण्णव अश्वमेध यज्ञ निर्विघ्नपणें पुरे झाले. शंभराव्या यज्ञाचा घोडा जेव्हां युवराज रघूच्या सेनेसह दिग्विजयासाठीं बाहेर पडला तेव्हां एकाएकीं रघूला असें दिसून आलें कीं, घोडा आपल्यासमोरून नाहींसा झाला आहे. घोड्याचे रक्षक, व स्वतः रघूहि, मोठ्या काळजींत पडले. घोडा कोठें गेला तें त्यांना समजेना. तेव्हां नन्दिनी तेथें धांवून आली. त्या दैवी गायीच्या अंगांतून निथळणाऱ्या पाण्यानें रघूनें आपले डोळे धुतांच त्याला असें आढळून आलें कीं, पित्याच्या अश्वमेधाचा घोडा इन्द्रानें पकडला असून तो त्याला गुप्तपणें स्वर्गांत घेऊन चालला आहे.

प्रथम रघूनें इन्द्राला सामोपचारानें, घोडा सोडून देऊन यज्ञ पुरा होऊं देण्याबद्दल विनंति केली. परंतु इन्द्राला अशी भीति पडली होती कीं, राजा दिलीपाच्या हातून शंभर अश्वमेध पुरे झाले तर तो आपल्या बरोबरीचा होईल; कारण शंभर अश्वमेध करणारा म्हणून 'शतक्रतु' हें नांव एकट्या इन्द्रालाच मिळालेलें आहे. त्यामुळें इन्द्रानें घोडा परत करण्याचें नाकारलें.

इन्द्र अश्वमेधाचा घोडा सरळपणें सोडून देण्यास तयार नाहीं असें पाहून मात्र रघूनें त्याला लढाईचें आव्हान दिलें. भयंकर लढाई झाली, परंतु इन्द्राच्या वज्रालाहि रघूनें दाद दिली नाहीं. त्याचें तें शौर्य व पराक्रम पाहून इन्द्र प्रसन्न झाला आणि त्यानें यज्ञाच्या घोड्याशिवाय दुसरें कांहींहि मागून घे, असें रघूला म्हटलें.

त्यावर रघूनें सांगितलें कीं, जर माझ्या वडिलांच्या अश्वमेधाचा घोडा परत देणें तुला शक्यच नसेल तर शंभर अश्वमेध पुरे केल्याचें पुण्य माझ्या वडिलांना लाभेल असें कर. या गोष्टीला इन्द्रानें संमति दिली व तो स्वर्गांत निघून गेला; आणि राजा दिलीपाला शंभर अश्वमेधांचें फळ मिळालें.

दिलीपाचें वय झाल्यावर त्यानें आपलें राज्य मुलाच्या म्हणजे रघूच्या हातीं सोंपविलें व तो राणी सुदक्षिणेसह तपश्चर्या करण्याकरितां अरण्यांत निघून गेला.

राजपद हातीं येतांच रघूचे गुण उठून दिसूं लागले. त्याच्या पराक्रमामुळें व शहाणपणामुळें राज्यांत सर्वत्र शांतता नांदूं लागली. परंतु त्याबरोबरच कांहींच्या मनांत रघूच्या या यशाबद्दल मत्सरहि उत्पन्न झाला. तेव्हां रघूनें दिग्विजय करण्याचें ठरवून त्यासाठीं त्यानें अश्वमेध यज्ञ केला.

दशदिशा जिंकून रघुराजा अयोध्येला परत आला. आणि त्याच्याबरोबरच राजधानींत आलेल्या अतुल संपत्तीचें दान करण्यासाठीं रघूनें लगेच विश्वजित् यज्ञाचा संकल्प सोडला.

विश्वजित् यज्ञांत रघूनें आपलें सर्वस्व दान करून टाकलें होतें. आतां त्याचा खजिना अगदीं रिकामा पडला होता. दान देण्यासाठीं त्याच्याजवळ कांहींच शिल्लक नव्हतें. अशा वेळीं वरतंतु मुनीचा शिष्य कौत्स रघूकडे द्रव्य मागण्यासाठीं येऊन पोहोंचला. परंतु राजानें कौत्साच्या सत्काराच्या वेळीं उदक सोडण्यासाठीं मातीचें भांडें हातीं घेतलेलें पाहून कौत्सानें द्रव्य मागण्याचा आपला विचार बोलून दाखविला नाहीं. कौत्साला गुरुदक्षिणा देण्यासाठीं १४ कोटी सोन्याच्या मोहरा पाहिजे होत्या. परंतु त्या न मागतांच कुशल प्रश्न झाल्यावर कौत्स परत जावयाला उठला. तेव्हां रघुराजानें त्याला थांबवीत आग्रहानें म्हटलें, "हे विद्वान, केवळ आपण येथें आल्यानें मला समाधान नाहीं. आपण मजकडून कांहीं तरी सेवा घ्यावी अशी माझी इच्छा आहे."

परंतु राजाची निष्कांचन परिस्थिति पाहून कौत्साला आपली एवढी मोठी मागणी त्याच्याकडे करण्याचें धाडस करवेना. तो म्हणाला, "चक्रवर्ती साम्राज्याचा धनी असूनहि आज सर्वस्व दानामुळें तुला जी धनहीनता प्राप्त झालेली आहे ती खरोखर तुला शोभूनच दिसत आहे. माझी गरज फार मोठी असल्यानें ती मी दुसरीकडून कोठूनतरी भागवून घेईन."

परंतु कौत्साला तसाच विन्मुख परत जाऊं देण्यास रघु तयार नव्हता. त्यानें त्याला विनंति केली कीं, "आपण थोडे दिवस माझ्या यज्ञशाळेंत थांबा. आपली गुरुदक्षिणा पुरी करण्याचा मी प्रयत्न करतों."

वास्तविक पृथ्वींतील सर्व राज्यांमधून आणलेलें धन

दानांत देऊन टाकल्यामुळें आतां एवढें मोठें धन कोठेंहि पृथ्वीवर शिल्लक नसेल याची जाणीव रघूला होती. तेव्हां त्यानें कैलासांतील धनपति कुबेरावरच स्वारी करून कौत्साला द्यावयाचें द्रव्य मिळविण्याचें ठरविलें. त्याप्रमाणें दुसरे दिवशीं स्वारीवर निघण्याचें ठरवून रघुराजा रात्रीं शस्त्रास्त्रांनीं सज्ज केलेल्या रथांतच झोंपला. परंतु राजा सकाळीं उठतो तों खजिन्यावरील अधिकाऱ्यानें येऊन सांगितलें कीं, रात्रीं बराच वेळपर्यंत खजिन्यांत सोन्याचा पाऊस पडत होता, त्यामुळें खजिन्यांत पुष्कळ द्रव्य सांठलेलें आहे. हें ऐकून राजानें कौत्साला बोलावून आणलें आणि खजिन्यांत जमा झालेलें तें सारें धन त्याच्या स्वाधीन केलें. परंतु तें धन कौत्साला पाहिजे असलेल्या १४ कोटी मोहरांपेक्षां कितीतरी अधिक होतें त्यामुळें त्यानें आपल्या गरजेपुरत्याच धनाचा स्वीकार करून बाकीचें घेण्यास नकार दिला. अखेर गुरुदक्षिणेपुरतेंच दान स्वीकारून तो निःस्पृह कौत्स परत जावयाला निघाला तेव्हां त्यानें रघुराजाला मनापासून आशीर्वाद दिला कीं, " हे रघुराजा, तुला प्राप्त व्हावयाचें बाकी आहे असें ऐश्वर्य आतां कांहींच उरलेलें नाहीं. म्हणून तुला इतकाच आशीर्वाद देतों की, तुझ्या थोर पित्याच्या पोटीं जसा त्याच्यासारखाच थोर मुलगा तूं स्वतः जन्माला आलास तसाच तुझ्या योग्यतेचाच मुलगा तुला प्राप्त होईल. "

पृथ्वीला जसा सूर्यापासून प्रकाश मिळतो त्याप्रमाणें ईश्वराच्या कृपेनें रघुराजाच्या पत्नीला एक तेजस्वी पुत्र झाला. त्याचें नांव रघूनें ' अज ' असें ठेविलें. अज आपल्या

पित्याप्रमाणेंच निपजला. तेजस्वी रूप, अपार पराक्रम आणि स्वभावांतील औदार्य यांपैकीं कशांतहि तो रघूपेक्षां कमी नव्हता. अज वयांत आला त्याच सुमारास विदर्भ देशाची राजकन्या इन्दुमति हिचें स्वयंवर ठरलें.या स्वयंवरासाठीं अज कांहीं सेना बरोबर घेऊन विदर्भाच्या राजधानीकडे निघाला. मध्यंतरीं नर्मदा नदीच्या तीरावर अजाच्या सैन्याचा तळ पडला असतांना एकाएकीं एका जंगली हत्तीनें सैन्यांत शिरून धुमाकूळ घालावयास सुरुवात केली. स्वतः राजा तेथें येऊन पोहोंचला, पण त्यानें हत्तीला ठार मारण्याऐवजीं केवळ जखमी करण्यापुरता त्याच्यावर एक हलकासा बाण सोडला. कारण राजेलोकांनीं जंगली हत्तीला ठार मारूं नये अशी रीत होती.

त्या हत्तीला अजाचा बाण जाऊन लागतांच मात्र मोठा चमत्कार घडून आलेला दिसला. त्या हत्तीनें तत्काळ आपलें हत्तीचें रूप टाकून देऊन तो एक तेजस्वी गंधर्व बनला; आणि राजकुमार अजावर कल्पवृक्षाचीं फुलें उधळीत तो त्याला म्हणाला, “ हे राजपुत्रा, मी प्रियदर्शन नांवाच्या गंधर्व राजाचा मुलगा प्रियंवद. माझ्या कांहीं अपराधामुळें मतंग ऋषींनीं शाप दिल्यामुळें मला हत्ती होऊन येथें राहावें लागलें होतें. परंतु तुझ्या बाणानें मला माझा पहिला देह प्राप्त होईल असा उःशापहि त्या क्षमाशील तपस्व्यानें मला दिला होता. त्याप्रमाणेंच हें घडून आलें आहे. म्हणून हे मित्रा, तुझ्या या उपकाराबद्दल माझ्याजवळ असलेलें हें प्रभावी सम्मोहनास्त्र तुला मी भेट म्हणून देतों, ह्याचा तूं स्वीकार कर. ”

प्रियंवद गंधर्वानें दिलेल्या सम्मोहनास्त्राचा कांहींशा संकोचानेंच स्वीकार करून अज विदर्भ–राजधानींत येऊन पोहोंचला. तेथें त्याचें विदर्भ राजा भोज यानें इतकें थाटाचें स्वागत केलें कीं, भोज स्वतः पाहुणा व बाहेरून आलेला अज हा घरचा यजमान असेंच लोकांना वाटूं लागलें.

भोज राजाची बहीण इन्दुमती म्हणजे सृष्टिकर्त्या विधात्याची एक अनुपम कलाकृतीच. स्वयंवराच्या वेषांतील त्या इन्दुमतीनें मंडपांत प्रवेश करतांच साऱ्या राजपुत्रांचीं मनें आपल्याकडे वेधून घेतलीं होतीं. इन्दुमतीबरोबर असलेली तिची मैत्रीण सुनंदा मग एकेका राजकुमाराचा परिचय इन्दुमतीला क्रमाक्रमानें करून देऊं लागली. प्रत्येकाच्या कुळाची थोरवी, त्याचा स्वतःचा पराक्रम, त्याचे सद्‌गुण यांची प्रशंसा करीत सुनंदेनें इन्दुमतीला तेथें जमलेल्या अनेक राजकुमारांची माहिती करून दिली. मगध, अंग, अवंती, मथुरा, कलिंग इत्यादि अनेक देशांच्या राजपुत्रांचा परिचय इन्दुमतीनें सुनंदेच्या तोंडून ऐकला पण तिनें त्यांपैकीं कोणालाच पसंती दिली नाहीं. अखेर ती अजाच्या समोर जाऊन उभी राहिली, तेव्हां आपल्याला तरी ही पसंत करील किंवा नाहीं या शंकेनें अजाचें हृदय धडधडूं लागलें. पण तेवढ्यांत त्याच्या उजव्या दंडावरील केयूरबंधाची जागा स्फुरण पावूं लागली तेव्हां त्याच्या मनांतील ती शंका दूर झाली. सुनंदेनें जेव्हां पाहिलें कीं इन्दुमति अजाच्या समोर जाऊन थबकली आहे तेव्हांच त्या चतुर स्त्रीनें ताडलें कीं, इन्दुमतीच्या मनांत अज भरला

आहे. त्यामुळें तिनें इन्दुमतीला अजाचा सविस्तर परिचय करून दिला आणि शेवटीं म्हणाली, " कुल, तेजस्विता, वाढतें वय व अनेक विद्या, शील इत्यादि सर्व बाबतींतअज तुझ्या योग्य आहे. तूं ह्याच्या गळ्यांत वरमाला घाल; म्हणजे हिऱ्याचें सोन्याशीं मीलन होऊन जाईल." सुनन्दा आपल्या मनांतलेंच बोलली असें समजून इन्दुमतीनें स्वयंवरमाला अजाच्या गळ्यांत घातली.

स्वयंवर उत्तम रीतीनें पार पडलें आणि तेथें जमलेले राजकुमार आपापल्या नगराकडे परत जाण्यासाठीं निघाले. भोज राजानें त्यांच्या योग्यतेला शोभेसा उत्तम आदरसत्कार करूनच त्यांची पाठवणी केली. परंतु ते मनांतून अजावर संतापलेलें होते. पूर्वीं रघुराजानें दिग्विजयाच्या प्रसंगीं या सर्वांचा पराभव करून त्यांच्याकडून करभार वसूल केलेला होता त्यामुळें ते अयोध्येच्या राजकुलावर अगोदरपासूनच रुष्ट झालेले होते. तशांत विदर्भाची अनुपमेय सुंदर अशी राजकन्याहि अयोध्येच्या युवराजालाच मिळाली याचें त्यांना वैषम्य वाटूं लागलें. म्हणून त्यांनीं आपसांत संगनमत करून, अज इन्दुमतीसह अयोध्येकडे परतत असतांना त्याच्यावर हल्ला केला. घनघोर युद्ध झालें. राजकुमार अज मोठ्या संकटांत सांपडला. पण तेवढ्यांत त्याला गंधर्वपुत्र प्रियंवदानें दिलेल्या संमोहनास्त्राची आठवण झाली. लगेच त्यानें त्या अस्त्रानें अभिमंत्रून शत्रुपक्षावर बाण सोडला. त्यामुळें हल्ला करून आलेल्या त्या सर्व सैन्याला भूल पडून तें झोंपी गेलें आणि अज विजयी होऊन इन्दुमतीसह अयोध्येला परत आला.

सम्राट रघूला पुत्राचें तें यश पाहून मोठा आनंद झाला. राज्य चालविण्यास तो आतां योग्य झाला आहे हें लक्षांत घेऊन त्यानें त्याच्या हातीं सर्व राज्यसूत्रें सोंपवून स्वतः वानप्रस्थाश्रम स्वीकारला. परंतु अजानें अतिशय आग्रह केल्यामुळें वनांत निघून न जातां रघूनें संन्यास घेऊन नगराबाहेर जाऊन तपश्चर्येंत काळ कंठण्यास सुरुवात केली. आणि अखेर एक दिवस त्या लोकोत्तर सम्राटानें योगमार्गानें आपल्या जीवनाचा त्याग केला.

आजचा थोर पिता रघु स्वर्गवासी झाल्यानंतर कांहीं दिवसांनीं इन्दुमतीच्या पोटीं सूर्यासारखा तेजस्वी पुत्र जन्माला आला. या मुलाची कीर्ति दशदिशांना फैलावेल असा विचार करून अजानें आपल्या या पुत्राचें नांव 'दशरथ' असें ठेविलें. प्रजा सुखसमृद्धीमुळें आनंदांत होती आणि अजहि पुत्रप्राप्तीमुळें चितारहित झालेला होता. अशा काळीं तो इन्दुमतीसह नगराजवळील एका उपवनांत आनंदानें बसला होता.त्याचवेळीं देवर्षि नारद वीणा वाजवीत आकाशमार्गानें दक्षिण समुद्रावरील गोकर्ण क्षेत्रीं असलेल्या शंकराची आराधना करण्यासाठीं जात असलेले दिसले. एकाएकीं वाऱ्याची जोराची झुळुक येऊन देवर्षि नारदांच्या वीणेला लटकणारी स्वर्गीय फुलांची माळा तेथून निसटली व आकाशांतून खालीं येऊन नेमकी इन्दुमतीच्या छातीवर पडली. ती पडत असतांनाच राणीनें त्या पुष्पमालेकडे पाहिलें आणि त्या दृश्यानें ती मूर्च्छित होऊन खालीं पडली व लवकरच मरण पावली,

प्रिय पत्नीच्या विरहानें अतिशय उदास झालेला अज

राजधानीला परत आला तेव्हां त्याची दु:खित मुद्रा पाहून नगरवासी लोकांनाहि रडूं कोसळलें. राजगुरु वसिष्ठांना जेव्हां ही दुर्वार्ता समजली तेव्हां त्यांनीं यज्ञाची दीक्षा घेतलेली होती. त्यामुळें त्यांनीं आपल्या शिष्याहातीं अजाला सांत्वनपर संदेश पाठविला. गुरु वसिष्ठांनीं अजाला कळविलें होतें कीं, " तूं राणी इन्दुमतीबद्दल शोक करूं नकोस. ती पूर्वजन्मीं हरिणी नांवाची एक अप्सरा होती. एक ऋषि घोर तपस्या करीत असतांना इन्द्रानें त्याची परीक्षा पाहण्यासाठीं या हरिणीला त्याच्याकडे पाठविलें. तेव्हां ऋषीनें त्या अप्सरेला शाप दिला कीं, तूं धरतीवर जन्म घेशील आणि तुला स्वर्गीय फुलांचें दर्शन होईल तेव्हांच तेथून मुक्त होऊन तूं स्वर्गांत परत जाशील. ती शापभ्रष्ट अप्सरा म्हणजेच राणी इन्दुमती. ती आतां मुक्त होऊन गेलेली आहे तेव्हां तूं दु:ख करीत बसूं नकोस. जो जन्माला येतो त्याच्यावर आपत्ती या येतातच. मरणें हा मनुष्याचा सहज धर्म आहे आणि जगणें मात्र कृत्रिमता आहे. "

गुरूंच्या या सांत्वनपर संदेशामुळें अजाच्या शोकाला थोडासा आवर पडला. इन्दुमतीचा मुलगा दशरथहि लहान होता त्याच्याकडे पाहून आणि इन्दुमतीचीं चित्रें व स्वप्नांत होणारीं दर्शनें यांवर समाधान मानून अजानें कशींबशीं आठ वर्षें काढलीं. पुढें मात्र पत्नीविरहाच्या शोकानें विकल झालेलें शरीर टिकवून धरणें त्याला अशक्य होऊं लागलें. तेव्हां गंगा–शरयूंच्या संगमावर आमरण अनशन आरंभून त्यानें देहत्याग केला आणि तो आपल्या प्रिय पत्नीच्या भेटीसाठीं स्वर्गाला निघून गेला.

अजानें शरीरत्याग करण्यापूर्वी आपला पराक्रमी मुलगा दशरथ याच्या हातीं राज्यभार सोंपविला होता. राजा दशरथ अग्नीप्रमाणें तेजस्वी व चंद्राप्रमाणें शीतल होता. स्वर्गांतील इन्द्रापर्यंत त्याचा मान होता. राजसूय यज्ञ आणि दिग्विजय अशा दोन्ही गोष्टी त्यानें एकदमच सुरू करून त्या उत्तम प्रकारें पार पाडल्या त्यामुळें तर त्याची कीर्ति चहूं दिशांना फांकली.

शरद ऋतु समाप्त होऊन वसंताचें आगमन झालें तेव्हां राजा दशरथानेंहि त्याचें आनंदानें स्वागत केलें. शिकारीचे दिवस आल्यामुळें त्याला विशेष उत्साह वाटूं लागला. दिवस दिवस तो शिकार करण्यांत रमूं लागला. असें होतां होतां एके दिवशीं एका हरणाच्या मागें लागला असतांना राजा आपल्या सैन्यापासून फार दूर निघून आला. तमसा नदीच्या तीरावर तो येऊन पोहोंचला तेव्हां तिथें रात्र झाली म्हणून त्यानें त्या ठिकाणींच विश्रांति घेण्याचें ठरविलें. रात्रीं तो त्या निर्जन ठिकाणीं बसला असतांना त्याला दूर अंतरावर एकादा जंगली हत्ती पाणी पीत असल्याचा गुड्गुड् असा आवाज आला. दशरथ हा शब्दवेधी धनुर्धर असल्यामुळें त्यानें तत्काळ त्या आवाजाच्या अनुरोधानें वेध घेऊन बाण सोडला. बाणानें आपलें काम केलें होतें, परंतु तें फार वाईट होतें. राजा दशरथाच्या कानीं एकाएकीं "बाबाऽ" असे आर्त शब्द आले. तेव्हां तो जागचा उठून त्वरेनें आपल्या लक्ष्याच्या स्थानाकडे निघाला. त्यानें जवळ जाऊन पाहिलें तों तो हत्ती नसून आपला बाण लागून एक निरपराध

मुनिकुमार वेळूच्या झुडपांत घायाळ होऊन पडला आहे. दशरथाला जणूं आपल्या काळजांतच बाण घुसला आहे असें तें करुणाजनक दृश्य पाहून झालें. वास्तविक राजानें जंगली हत्तीला ठार मारूं नये अशी पद्धत आहे. परंतु ती लोकरीत शिकारीच्या नादांत दशरथाच्या हातून मोडली होती. त्याचें जणूं प्रायश्चित्तच आपल्याला मिळत आहे, असेंहि त्याला वाटूं लागलें.

अधिक तपास करतां त्याला समजलें कीं, तो एक गरीब ब्राह्मणाचा मुलगा असून त्याचें नांव श्रवणकुमार आहे. तो आपल्या आंधळ्या व म्हाताऱ्या आईबापांना कावडींत बसवून तीर्थयात्रेला घेऊन चाललेला आहे. त्या मुलाच्या सांगण्यावरून राजानें त्याला उचलून घेतलें व त्यानें आपल्या आईवडिलांना बसवून ठेवलें होतें तेथें त्याला आणलें. तेथें पोहोंचतांच दशरथानें आपलें नांव सांगून अज्ञानानें आपल्या हातून हें पाप घडलें असल्याचेंहि स्पष्ट केलें. जखमी श्रावणाच्या छातींतून दशरथानें बाण उपसून घेतांच श्रावणाचे प्राण निघून गेले. तें पाहून त्याच्या आंधळ्या वृद्ध बापाला भयंकर दुःख झालें. त्यानें स्वतःच्या डोळ्यांतून वाहणारे अश्रूच ओंजळींत धरून दशरथाला शाप दिला, "हे राजा, माझ्याप्रमाणेंच तुलाहि आपल्या मुलाबद्दल शोक करीत करीत शेवटीं प्राण सोडावे लागतील." या शापानें अंतःकरण पोळून निघत असतांनाच दशरथ अयोध्येला परत आला.

त्यानंतर पुष्कळ वर्षें लोटलीं परंतु दशरथाला पुत्रलाभ कांहीं झाला नाहीं. तो तर आतां म्हातारा होऊं लागला होता. म्हणून त्यानें पुत्रकामेष्टि यज्ञ क[illegible]ण्याचें ठरविलें.

याच सुमारास रावणाच्या छळानें त्रस्त झालेले देव, उन्हानें पोळलेले प्रवासी वृक्षाच्या आश्रयाला जातात त्याप्रमाणें, भगवान विष्णूपाशीं आपलें गाऱ्हाणें घेऊन गेले होते. विष्णूनें त्यांना अभय देऊन सांगितलें कीं, "रावणाला ब्रह्मदेवापासून "तुला देवांकडून मृत्यु येणार नाहीं" असा वर मिळालेला आहे. म्हणून त्याच्या नाशासाठीं मला मनुष्य देह धारण करावा लागणार असल्यानें मी पृथ्वीवर राजा दशरथाच्या कुळांत जन्म घेऊन रावणाचा संहार करणार आहें. तुम्ही मुळींच काळजी करूं नका."

दशरथाचा पुत्रकामेष्टी यज्ञ ऋष्यशृंगांच्या अध्वर्युत्वाखालीं यथासांग पार पडला आणि त्याचें फळ म्हणून कांहीं काळानंतर दशरथाला चार पुत्र झाले. कौसल्येला राम, कैकयीला भरत आणि सुमित्रेला लक्ष्मण व शत्रुघ्न असे हे दशरथाचे चार मुलगे धर्म, अर्थ, काम व मोक्ष या चार पुरुषार्थांप्रमाणें शोभत होते. हे चारहि बंधु परस्परांवर उत्कट प्रेम करीत आणि तसेच ते आपल्या पित्यालाहि फार मानीत.

हे राजपुत्र लहान असतांनाच एकदा विश्वामित्र ऋषि दशरथाकडे आले. त्यांनीं आपल्या यज्ञाचें राक्षसांपासून रक्षण करण्यासाठीं राम-लक्ष्मणांना आपल्याबरोबर देण्याची मागणी केली. राम-लक्ष्मण हीं अजून तसें पाहिलें तर कोवळीं बालकें होतीं. पण पराक्रम वयावर थोडाच अवलंबून असतो! दशरथानें थोड्या नाखुषीनेंच आपल्या या लहान मुलांना विश्वामित्र[illegible] पाठविलें. परंतु त्या लहान मुलांनीं फार मो[illegible]केला. विश्वामित्रांच्या आश्रमाकडे येत असत[illegible] रस्त्यांतच त्यांनीं ताटका नांवाच्या

भयंकर राक्षसीला ठार मारलें. ताटका रामाच्या बाणांनीं मरून खालीं कोसळतांना तें अरण्यच मोठ्यानें हादरलें असें नव्हे; राक्षसराज रावणाच्या सिंहासनालाहि त्यामुळें धक्का बसला. हा रामाचा पराक्रम पाहून राक्षसांच्या नाशासाठीं विश्वामित्रांनीं लगेच त्याला एक दिव्य अस्त्र दिलें. प्रत्यक्ष यज्ञ चालू असतांना राम-लक्ष्मणांनीं चाल करून आलेल्या राक्षस-सेनेपैकीं सुबाहूला यमसदनास पाठविलें व त्याचा सहाय्यक मारीच याला पळवून लावलें.

विश्वामित्रांच्या यज्ञाचें अशाप्रकारें रक्षण करण्याचें काम पुरें होतें न होतें तोंच विश्वामित्रांना असें समजलें कीं, मिथिलेच्या जनक राजानें आपली कन्या सीता हिचें स्वयंवर मांडलें आहे. तेव्हां राम–लक्ष्मणांना बरोबर घेऊन विश्वामित्र मिथिलेला निघाले. येतां येतां रामानें आपल्या पवित्र पायाच्या स्पर्शानें दगड होऊन पडलेल्या अहिल्येचा उद्धार केला. मिथिलेला येऊन पोहोंचल्यावर जनकानें विश्वामित्राचा उत्तम आदरसत्कार केला. त्यांच्या येण्याचा हेतु समजल्यावर व त्या कोवळ्या राजकुमारांना पाहिल्यावर जनकानें मोठ्या दुःखित अंतःकरणानें सांगितलें कीं, "माझ्यापाशीं असलेल्या परशुरामाच्या प्रचंड शिवधनुष्याला बाण लावील त्यालाच सीता देण्याचा मी पण केलेला आहे. या लहान मुलांना हें कसें जमेल?" परंतु विश्वामित्राच्या आग्रहावरून जनकानें जेव्हां तें प्रचंड शिवधनुष्य रामापुढें आणविलें तेव्हां रामानें सहज लील[illegible]ें वांकविलें; आणि वाकवितांनाच तें मोडून पडले[illegible]ोडून पडतांना त्याचा काडदिशीं आवाज झाला त्यानें क्ष[illegible]शत्रु परशुराम

मात्र डिवचला गेला. त्या आवाजानें जणूं त्याला कळविलं कीं, तूं नष्ट केलेली क्षत्रियजात पुन्हा जिवंत झालेली आहे!

जनकाचा पण रामानें पुरा केल्यामुळें जनकानें दशरथाला सन्मानानें मिथिलेला बोलावून आणलें. मग रामाचा सीतेशीं मोठ्या थाटानें विवाह झाला. त्याबरोबरच जनकाची औरस मुलगी उर्मिला हिचा विवाह लक्ष्मणाशीं आणि जनकाच्या दोन पुतण्या मांडवी व श्रुतकीर्ति यांचे विवाह अनुक्रमें भरत व शत्रुघ्न यांच्याशीं करून देण्यांत आले.

या विवाहसमारंभाहून दशरथ रामलक्ष्मणांसह परत येत असतांना त्यांना परशुरामानें गांठलें. त्यानें रामाला हिणविण्याचा प्रयत्न करीत म्हटलें कीं, "तें शिवधनुष्य मोडलेंस यांत नवल नाहीं; माझ्या हातांतील धनुष्याला बाण लावलास तर तूं खरा पराक्रमी. तेवढ्यानेंच माझा पराभव झाला असें मी मानीन." रामानें याहि धनुष्यावर लीलेनें बाण चढवलेला पाहून मात्र परशुरामानें रामाचा श्रेष्ठपणा मान्य केला. आणि रामाच्या त्या अमोघ बाणानें स्वत:चा स्वर्गाला जाण्याचा मार्ग गमावून तो आल्या वाटेनें परत गेला.

दशरथ राजा अति वृद्ध झाल्यामुळें त्यानें साहजिकच रामाला राज्याभिषेक करण्याचें ठरविलें. परंतु आयत्यावेळीं दशरथानें कैकयीला पूर्वीच्या काळांत देऊं केलेले दोन्ही वर तिनें मागून घेतले. एकानें तिनें मागितलें कीं, रामाला चौदा वर्षें वनवासा[illegible]वावें आणि दुसऱ्यानें तिनें भरताला राज्यावर बसवि[illegible]धरला. त्याप्रमाणें राम सीता व लक्ष्मण यांच्य[illegible] वनांत निघून गेला. परंतु राज्यवैभवाच्या [illegible] कैकयीच्या पदरीं पडलें.

भरतानें आपल्या दुष्ट आईचा धिक्कार करून राज्यावर बसण्याचें नाकारलें व तो रामाला अयोध्येला परत आणण्यासाठीं त्याच्या मागें चित्रकूट पर्वतावर गेला. परंतु राम परत न आल्यामुळें त्यानें रामाच्या पादुका नन्दिग्रामांत स्थापन केल्या आणि अयोध्येला परत न येतां तेथेंच विरक्तपणानें राहून तो राज्यकारभार पाहूं लागला.

थोडचा दिवसांनंतर राम चित्रकूटावरून पंचवटींत येऊन राहिला. पंचवटींतील निवासांत रावणाची बहीण शूर्पणखा विवाहाच्या इच्छेनें रामाकडे आली पण लक्ष्मणानें तिचे नाककान कापून तिला हांकलून दिलें. या अपमानाचा सूड घेण्यासाठीं खर व दूषण या राक्षसांनीं राम–लक्ष्मणावर चढाई केली पण लढाईंत ते स्वतःच सैन्यासह मारले गेले. हें वृत्त समजतांच लंकाधिपति रावणानें मारीचाला सुवर्णमृगाचें रूप घेण्यास सांगून राम–लक्ष्मण त्याच्या मागें गेले असतां इकडे सीतेला कपटानें पळवून नेलें. राम–लक्ष्मण पर्णकुटींत परत आल्यावर सीता नाहींशी झालेली पाहून त्यांना फार दुःख झालें. सीतेसह पळून जाणाऱ्या रावणाशीं दशरथाचा एक म्हातारा मित्र जटायू यानें निकराचा सामना दिला होता. सीतेच्या शोधासाठीं रानोमाळ भटकत असतांना राम–लक्ष्मणांना तो आढळला व त्याच्याकडून सीतेला रावणानें पळवून नेल्याचें त्यांना समजलें. तसेंच पुढें गेल्यावर त्यांची वानरराज [illegible]शीं गांठ पडली. रामानें सुग्रीवाला त्याचें [illegible] व पत्नी तारा परत मिळवून दिली. या[illegible]रामाला साहाय्य मिळून सीताशोधासाठीं [illegible]ीर चहूं दिशांना

पाठविले. तेव्हां जटायूचा भाऊ संपाति याच्याशीं यांपैकीं कांहीं वानरांचीं गांठ पडून संपातीकडून त्यांना समजलें कीं, रावणानें सीतेला लंकेंत नेऊन ठेवलें आहे. तेव्हां वानर-प्रमुख हनुमान यानें सागर उल्लंघून लंकेंत सीतेचा शोध लावला व तें वृत्त रामाला कळविलें. तेव्हां रामानें सागरावर मोठा पूल उभारून लंकेवर स्वारी केली. रावणासहित सर्व राक्षसकुळाचा संहार करून रामानें सीतेला परत आणली. त्यानें लंकेच्या राज्यावर रावणाचा शरण आलेला भाऊ बिभीषण याला बसविलें. आणि मग मोठ्या आनंदानें चौदा वर्षांचा वनवास संपवून राम रावणा-कडून जिकलेल्या पुष्पक विमानांतून अयोध्येकडे परत निघाला. त्यावेळीं हनुमान, सुग्रीव आणि तसेंच राम-सेवक बिभीषण हेहि त्याच्याबरोबर होते.

पुष्पकांतून परत येत असतांना रामानें पूर्वीच्या वनवासां-तील अनेक स्थळें सीतेला दाखविलीं. पंचवटी, चित्रकूट, गंगा-यमुना संगम अशीं स्थळें पाहात पाहात राम सीतेसह शरयू नदीपर्यंत येऊन पोहोंचले. तेथें आपल्या स्वागतासाठीं भरत आपल्या गुरुजनांसह येत असलेला रामाला दिसतांच त्यानें तेथेंच पुष्पक विमान उतरविलें. रामानें खालीं उतर-तांच प्रथम गुरु वसिष्ठांना वंदन करून मग भरताला दृढालिंगन दिलें.

लवकरच [illegible] समारंभानें राज्याभिषेक झाला. बिभीषण[illegible]ाय्यकर्तें व ऋषि–मुनि यांचा यथोचित [illegible]ा आपापल्या स्थानीं

परत जाण्यासाठीं रामानें निरोप दिला. रामाच्या राज्यांत प्रजा सुखानें राहूं लागली.

असा कांहीं काळ लोटल्यावर एक दिवस सीतेकडे पाहात असतां तिच्या लक्षणांवरून तिला दिवस गेले आहेत असें रामाला दिसून आलें. तेव्हां त्यानें मोठ्या कौतुकानें तिला विचारलें कीं, "प्रिये, तुला कसले डोहाळे लागले आहेत?" सीतेनें म्हटलें कीं, "मला गंगेच्या तीरावर जाऊन राहावेंसें वाटतें." रामानें तिचे हे डोहाळे पुरविण्याचें लगेच आश्वासन दिलें परंतु त्याला तें मोठ्या चमत्कारिक रीतीनें व दुःखी अंतःकरणानें पुरें करावें लागलें! त्याच्या गुप्तचरांकडून त्याच्या कानावर असें आलें कीं, राक्षसराज रावणाच्या घरीं राहिलेल्या सीतेच्या शीलाबद्दल नगरवासी लोक शंका घेत आहेत. त्यावर राम इतकेंच म्हणाला कीं, "सीता सर्वस्वीं शुद्ध आहे याविषयीं मला यत्किंचितहि शंका नाहीं. परंतु लोकापवाद हा फार बलवत्तर आहे. निष्कलंक जीवन कंठावयाचें असेल तर त्याकडे लक्ष देणें आवश्यकच आहे." आणि म्हणून त्यानें सीतेला गंगेच्या कांठीं अरण्यांत नेऊन सोडण्याची लक्ष्मणाला आज्ञा केली.

लक्ष्मण सीतेला घेऊन गंगादर्शन करविण्याच्या निमित्तानें अरण्यांत आला व तेथें त्यानें रामाची ती भयंकर आज्ञा तिच्या कानीं घातली. सती सीतेला त्यामुळें अर्थातच भयंकर दुःख झालें. परंतु तिनें [illegible] उत्तर केलें कीं, "माझा निरोप रामाला [illegible] परंतुं वांकी [illegible] लोकापवादाच्या भीतीनें तुम्ही माझा [illegible] भातां [illegible] [illegible] च्या कुळाच्या कीर्तीला व ज्ञानालाहि [illegible] ला त्यानें क्ष [illegible] ीग तुमच्या इच्छे-

प्रमाणें मी येथें अरण्यांत तुमचें कल्याणच चिंतीत राहीन. "

अतिविरहामुळें अतिशय विलाप करणाऱ्या त्या सीतेला एकटीच सोडून लक्ष्मण जड अंतःकरणानें परत गेला. परंतु थोड्या वेळानंतर तो करुण विलाप कानीं पडून तेथून जवळच आश्रम करून राहिलेले वाल्मीकि ऋषि तेथें धांवून आले. त्यांनीं सीतेचें सांत्वन करून तिला आपल्या आश्रमांत नेलें आणि 'आपल्या माहेरींच आली आहेस असें समजून तूं निःसंकोचपणें येथें राहा ' असें सांगितलें. सीता त्यानंतर तेथेंच तपस्विनीप्रमाणें राहूं लागली. रामानेंहि सीतेचा त्याग केला असला तरी तिच्यावरील प्रीति कमी केली नाहीं. यज्ञाच्या वेळीं यजमानपत्नी जवळ असावी लागते, पण त्यासाठीं त्यानें दुसरा विवाह केला नाहीं, तर सीतेचीच सोन्याची मूर्ति करून ती आपल्या डाव्या बाजूला बसविली. ही हकीकत जेव्हां वाल्मीकींच्या आश्रमांत उदासपणें दिवस कंठीत असलेल्या सीतेला समजली तेव्हां तिलाहि पुष्कळ समाधान वाटलें.

याप्रमाणें रामाचें राज्य चालू असतांनाच यमुना तीरावरील ऋषींना लवणासुर नांवाचा राक्षस त्रास देऊं लागला. तेव्हां लगेंच रामानें शत्रुघ्नाला तिकडे पाठविलें. शत्रुघ्न यमुनातीराकडे लवणाचा समाचार घेण्यासाठीं चालला असतांना मार्गांत त्यानें वाल्मीकि ऋषींच्या आश्रमांत वास्तव्य [illegible]न तेथें असतांनाच रामपत्नी सीता प्रसूत हो[illegible] मुलगे झालें. तें ऐकून शत्रुघ्नाला अथा[illegible]ला. परंतु हें वृत्त रामाला इतक्यांत[illegible]त्याला वाल्मीकींनीं

सूचना दिली. त्याप्रमाणें, लवणासुराला ठार मारून आणि मथुरा व विदिशा या दोन नगरींवर आपले मुलगे अनुक्रमें शत्रुघाती व सुबाहु यांची नेमणूक करून तो अयोध्येला परत आला तरी त्यानें पुत्रजन्माची गोष्ट मात्र रामाला सांगितली नाहीं.

इक्ष्वाकु कुलाचें राज्य सुरू झाल्यापासून त्या राज्यांत कोणी अकालीं मृत्यु पावत नसे. असें असतांना एके दिवशीं एक ब्राह्मण रडत रडत राजवाड्यांत आला. त्याचा तरुण मुलगा मरण पावला होता. तेव्हां राम त्या ब्राह्मणाच्या मुलाला तरुणपणींच घेऊन जाणाऱ्या यमाला शिक्षा करण्यास तयार झाला. परंतु इतक्यांत आकाशवाणी होऊन त्याला समजलें कीं, आपल्या राज्यांत कांहीं तरी अधर्म झालेला आहे त्याचा हा परिणाम आहे. म्हणून रामानें अधिक चौकशी केली तेव्हां त्याला असें आढळून आलें कीं, शंबूक नांवाचा एक शूद्र स्वतःला उलटें टांगून घेऊन स्वर्ग मिळविण्यासाठीं तप करीत आहे. वास्तविक शूद्राला असें तप करण्याचा अधिकार वर्णाचाराच्या धर्माप्रमाणें नव्हता. म्हणून रामानें त्या अधर्मानें वागणाऱ्या शंबुकाचा शिरच्छेद केला आणि त्यामुळें त्या अकालमृत्यु पावलेल्या ब्राह्मणपुत्राचे प्राण परत आले. ब्राह्मण रामाला आशीर्वाद देत आपल्या घरीं आनंदानें परत गेला तसाच साक्षात् रामाच्या हातून मृत्यु आ[illegible] शंबूकहि सुखानें स्वर्गाला गेला.

वाल्मीकि मुनींच[illegible]ज्या दोन मुलांना जन्म दिला त्यांचीं [illegible] लव व कुश अशीं

ठेवलीं. स्वत: रचिलेलें 'रामायण' वाल्मीकींनीं त्यांच्याकडून पाठ करवून घेतलें. आपल्या मुलांच्या गोड गळ्यांतून वाल्मीकींनीं लिहिलेलें तें थोर काव्य ऐकून सीतेच्या अंत:करणांतील विरहदु:खाचा तापहि पुष्कळ कमी झाला.

इकडे रामानें अश्वमेध यज्ञाची तयारी चालविली होती. राजे व ऋषी त्यासाठीं अयोध्येंत गोळा झाले. आवश्यक होती त्यापेक्षां कितीतरी अधिक यज्ञसामुग्री जमा झाली. आणि यज्ञाच्या रक्षणासाठीं आतांपर्यंतचे यज्ञविध्वंसक राक्षसच येऊन उभे राहिले. त्या गडबडींतच वाल्मीकींनीं शिकविलेलें 'रामायण' गात कुश-लव अयोध्या राजधानींत हिंडत होते. त्यांच्या त्या काव्यगायनानें अयोध्यावासी लोक तर वेडे होऊन गेले होते. हळुहळु ह्या बालगायकांची कीर्ति रामाच्या कानावर गेली. त्यानें त्या दोघांनाहि बोलावून घेतलें. राजसभेंत येऊन त्यांनीं 'रामायण' गाऊन दाखविलें, तेव्हां त्या दोन मुलांच्या गानचातुरीपेक्षां त्यांच्या निस्पृह-वृत्तीमुळेंच लोकांचें लक्ष त्यांच्याकडे अधिक आकृष्ट झालें. रामानें त्यांना दिलेलें दान त्यांनीं स्वीकारलें नाहीं, तेव्हां रामानें मोठ्या प्रेमानें व कुतुहलानें त्यांना विचारलें कीं, " मुलांनो, हें काव्य कोणी केलें ?" वाल्मीकीमुनींनीं हें काव्य केलेलें असून त्यांनींच तें आपल्याला शिकविलें असें त्या मुलांनीं सांगितलें. त्यांच्या तोंडून वाल्मीकींचें नांव ऐकतांच रामानें [illegible] वाल्मीकींच्या आश्रमाकडे धांव घेतली व [illegible] त्यांच्या पायावर अर्पण केलें. तेव्हां वाल्मी[illegible] " मला तुझें राज्य कांहीं नको, पण [illegible] विशुद्धशील अस

लेली पत्नी सीता यथें आहे तिचा मात्र तूं स्वीकार कर." रामाला आतां समजून आलें कीं कुश-लव हे आपलेच मुलगे आहेत. सीतेचा परत स्वीकार करण्याबद्दल वाल्मीकींनीं सुचविल्याचें ऐकून राम म्हणाला, "लंकेतून परतल्यावर सीतेनें केलेलें अग्निदिव्य आमच्या समक्ष झालेलें आहे. तथापि शंका घेणाऱ्या अयोध्यावासी लोकांच्यापुढें तिनें आपली शुद्धता पटवून दिली तर या मुलांसह मी तिचा स्वीकार अवश्य करीन."

वाल्मीकींच्या सांगण्यावरून सीता या दिव्याला तयार झाली. सभेपुढें येऊन तिनें सर्वांसमक्ष पृथ्वीमातेला उद्देशून अशी प्रार्थना केली कीं, "कायावाचामनानें जर कधींहि मी माझ्या पातिव्रत्यांत उणीव आणली नसेल तर हे पृथ्वीमाते, तूं मला आपल्या उदरांत घे." सीतेची ही प्रार्थना पुरी होते न होते तोंच जमीन दुभंगली आणि तींतून सिंहासनावर विराजमान झालेली धरतीमाता वर येऊन ती शुद्ध सती सीतेला आपल्याबरोबर घेऊन गेली. राम 'नको, नको' म्हणत होता,तो पृथ्वीवर रागावलाहि होता.परंतु 'जें होणारें तें टळत नाहीं,' असें सांगून ऋषींनीं त्याची समजूत घातल्यावर लव-कुशांना बरोबर घेऊन तो अयोध्येला परतला.

रामाचा अश्वमेध पुरा झाला. भरतानें सिंधु देशांतील गंधर्वांची बंडाळी मोडून तेथें तक्षशीला व पुष्कलावती या दोन राजधान्यांत आपले दोन [illegible] व पुष्कल यांची नेमणूक करून तोहि अ[illegible] अंगद व चंद्रकेतु या लक्ष्मणांच्या दो[illegible]चें राज्य देण्यांत आलें. शत्रुघ्नाचे दों[illegible] मथुरा व विदिशा

येथें राज्य करीत होतेच. आतां रामानें आपल्या शिरावरीलहि राज्यभार उतरण्याचा विचार चालविला.

याच सुमारास प्रत्यक्ष काळ मुनिवेशानें रामाच्या भेटीला आला व त्यानें रामाशीं एकान्तांत बोलणें करण्याची इच्छा प्रकट केली. त्यानें अशी अट घातली होती कीं, जो कोणी आमच्या एकान्ताचा भंग करील त्याचा रामानें त्याग करावा. त्याप्रमाणें कबूल करून रामानें त्याची भेट घेतांच त्यानें आपलें रूप प्रकट करून आतां अवतारकार्य संपलें, तेव्हां निजधामाला परत चलण्याचा ईश्वरी आदेश रामाला कळविला. परंतु त्यांचें बोलणें संपण्यापूर्वींच परमक्रोधी दुर्वास ऋषी बाहेर येऊन रामाच्या भेटीचा आग्रह धरून बसले. त्यांच्या क्रोधानें रामावर कांहीं अरिष्ट येऊं नये या हेतूनें रामाशीं तो मुनीवेशधारी मृत्यु एकान्तांत बोलत असतांनाच लक्ष्मण तेथें गेला. अर्थातच यमाच्या एकान्ताचा भंग होऊन त्याबद्दल प्रायश्चित्त भोगण्याची पाळी लक्ष्मणावर आली. तेव्हां रामानें दिलेलें वचन खरें करण्यासाठीं लक्ष्मणानें शरयूतीरीं जाऊन योगमार्गानें प्राणत्याग केला.

आतां राम अगदीं उदास झाला. कौसल्यादि माता पूर्वींच हा लोक सोडून गेलेल्या होत्या. त्याचा आवडता बंधु व उजवा हात लक्ष्मणहि कायमचा निघून गेला. तेव्हां त्यानें कुश-लवाची स्थापना कुशावती व इरावती या ठिकाणीं करून व राज्यभार [illegible] वर सोंपवून तो निश्चित झाला; आणि आपल्या [illegible] बरोबर घेऊन त्यानें उत्तरेकडे महाप्रस्थान [illegible] ाठीं स्वर्गाचें विमान आलेलें पाहून अयो[illegible] ूंत देहसमर्पण केले

त्यांचे रामाकडे लागलेले आत्मे मात्र रामरूपांतच विलीन होऊन त्याच्याबरोबरच स्वर्गाला गेले.

रामाचें अवतारकृत्य पूर्ण झालें. रावणाचा वध करून त्यानें देवांना रावणाच्या बंदींतून सोडविलें होतें. त्याच्या या अवतारकार्याचे जणूं कीर्तिस्तंभच असे दोघेजण हनुमान व बिभीषण मात्र रामाच्या मागें या पृथ्वीतलावर राहिले. दक्षिणेला चित्रकूटावर बिभीषण व उत्तरेला गंधमादन पर्वतावर मारुति अशी स्थापना स्वत: रामांनींच करून ठेवली.

राम अशा प्रकारें कृतकार्य होऊन निजधामाला गेल्यावर रामलक्ष्मणादिकांच्या सात मुलांनीं कुशावर्तामध्यें राज्य करीत असलेल्या कुशालाच अधिराज मानलें. इक्ष्वाकु वंशांतील हा श्रेष्ठ राजा राज्यकारभारांत मोठा कुशल होता व त्याचे सातहि बंधु त्याला ज्येष्ठपणाचा मान देत होते.तरी इक्ष्वाकु वंशाची पुरातन राजधानी अयोध्या मात्र ओसाड पडली होती. तेव्हां एका रात्रीं अयोध्येच्या अधिष्ठात्री देवतेनें कुशाच्या स्वप्नांत जाऊन त्याला आदेश दिला कीं, तूं अयोध्येला परत येऊन आपल्या वाडवडिलांची पुरातन राजधानी पुन्हां वसव.

त्याप्रमाणें कुश पुन्हा अयोध्येला आल्यावर अयोध्येला पूर्वीचें वैभव प्राप्त झालें.

कुशाला कुमुद्वतीपासून जो मुलगा झाला तोच इक्ष्वाकु वंशाचा पुढील राज्यधारक [illegible] ह्याचें नांव अतिथि. इन्द्राच्या बाजूनें दुर्जय ना[illegible]परंतु वांक[illegible] अं[illegible] लढत असतांना कुश मारला गेला ते[illegible] आतां [illegible] [illegible]ध्येच्या राज्यावर आला. अतिथि जि[illegible]ाला त्यानें क्ष[illegible] म[illegible] तितकाच उदारहि

होता आणि तसाच समरशूरहि पण होता. राज्याभिषेकाच्या वेळीं त्यानें मोठा दानधर्म केला. त्या वेळीं कारागृहांतील बंद्यांना तर सोडलेंच पण पिंजऱ्यांतील पोपटांनाहि मुक्त करून त्यांना स्वातंत्र्याचा आनंद उपभोगू दिला. त्यानें जसा आपल्या बाहुबलानें सर्व राजांवर धाक ठेवला तसाच आपल्या धर्मनिष्ठ वर्तनानेंहि तो त्यांच्या आदरला पात्र झाला होता. इन्द्र त्याच्या राज्यांत वेळच्यावेळीं पर्जन्यवृष्टि करीत होता. यम लोकांचें आरोग्य राखीत होता. वरुण नौकानयनाचे मार्ग खुले ठेवीत होता आणि कुबेर विपुल संपत्ति देत होता.

अतिथीचा विवाह निषध देशाच्या राजकन्येशी झाला. त्याच्या मुलाचें नांव निषध. निषधानेंहि पुष्कळ वर्षेंपर्यंत या समुद्रवलयांकित पृथ्वीचें राज्य केलें. निषधाचा मुलगा नळ नळाच्या पुत्राचें नांव नभ; कारण त्याची शरीरकान्ति निळसर वर्णाची होती. नभाचा मुलगा पुण्डरीक व धनुर्धर. पुण्डरीकाचा पुत्र शान्तस्वभावी क्षेमधन्वा. क्षेमधन्वाला राज्यावर बसविल्यानंतर पुण्डरीकानें वानप्रस्थाश्रमाचा स्वीकार केला. देवानिक हा क्षेमधन्व्याचा पुत्र आपल्या मधुर वाणीमुळें सर्वांचा आवडता झाला होता. देवानिकानंतर अहीनगु, त्याच्यामागून पारियात्र व पारियात्र्याच्या मागें शील राज्यावर आला. पारियात्रानें आपला मुलगा शील [illegible] वर त्याच्यावर राज्याचा भार टाकला परंतु [illegible] वंजांप्रमाणें वानप्रस्थ न स्वीकारतां सां[illegible] छंदानें रमूं लागला. शीलाच्या पाठो[illegible] ाभि किंवा उन्नाभ

आणि त्याच्यामागून क्रमानें पुढील राजे झाले : वज्रणाभ, शंखण, व्युषिताश्व, विश्वसह, हिरण्यनाभ, कौशल्य, ब्रह्मिष्ठ, पुत्र, पुष्य व ध्रुवसंधि. यांपैकीं ध्रुवसंधि हा शिकार करीत असतांना सिंहाकडून मारला गेल्यानें त्याचा अल्पवयी मुलगा सुदर्शन याला मंत्रिमंडळानें राज्याभिषेक केला. हा बाल-राजा असूनहि त्यानें वृद्ध मंत्र्यांच्या सहवासामुळें राज्यशकट उत्तम रीतीनें हांकला. सकल शस्त्र-शास्त्र-पारंगत होऊन त्यानें मोठ्या तेजस्वीपणानें राज्य केलें आणि अखेर म्हातार-पणांत अग्निवर्ण या आपल्या मुलावर राज्यकारभार सोंपवून सुदर्शन तपश्चर्या करण्यासाठीं वनांत निघून गेला.

अग्निवर्णाला राज्य चालविण्याच्या दृष्टीनें कांहींच श्रम पडले नाहींत. कारण त्याच्या पित्यानें प्रकट केलेंलें तेजच अद्याप त्याच्या राजसत्तेचा दबदबा संभाळून होतें. परंतु अग्निवर्णानें तो विनासायास चालणारा राज्यभारहि सोस-ण्याचें सोडून सुख विलासांतच आकंठ बुडी मारली. त्यामुळें अखेर त्याला क्षय होऊन मृत्युमुखीं पडावें लागलें. तरीहि राज्यकार्यकुशल व राजनिष्ठ मंत्र्यांनीं ती दुर्वार्ता बाहेर फारशी फुटूं न देता अग्निवर्णाच्या शवाचा अंत्यसंस्कार राजवाड्याजवळील उद्यानांतच उरकला. यावेळीं अग्नि-वर्णाची एक राणी गरोदर होती. तेव्हां पौरजनांच्या अनु-मतीनें मंत्र्यांनीं तिलाच राज्याभिषेक करून सिंहासनावर बसविली. ही गरोदर राणी [illegible]तु वांक[illegible] [illegible] लक्षून आपल्या स्वामिनिष्ठ मंत्र्यांच्या [illegible] [illegible] ध्ये [illegible] ज सांभाळून भावी राज्याधिका[illegible]ला त्यानें क्ष[illegible] [illegible] ति[illegible]ण करीत होती आणि तिची प्रजा [illegible] [illegible]णाऱ्या पुत्राची वाट पाहात राहिल[illegible]

संस्कृत साहित्य सरितेचीं पुस्तकें

परंतु वांक नून आपल
आतां ज्ञातो सांभाळ
झाला त्यानें क्ष ण करीत
णाना पु

